# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

"वनवर्धन", प्रधान डाकघर कार्यालयासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

☎ कार्यालय - (०२३१) २६५३६३२ फॅक्स - २६५९२३३

E-mail - ccftkolhapur@gmail.com

## वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६

वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६ चे अनुषंगाने प्रथम टप्प्यामध्ये तात्पुरत्या यादीमधील उमेदवारांची शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांची तपासणी **दिनांक ६.१२.२०१६ व ७.१२.२०१६** या कालावधीमध्ये समितीमार्फत करण्यात आलेली आहे. त्यामध्ये अपात्र असलेल्या उमेदवारांच्या अनुषंगाने खुल्या प्रवर्गासाठी तात्पुरती पूरक यादी व मागासवर्गीय तसेच समांतर आरक्षणामधील तात्पुरती यादी (दुसरा टप्पा) www.kolhapurforest.co.in या संकेतस्थळावर दिनांक १५.१२.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर यादीमधील उमेदवारांना त्यांची मूळ कागदपत्रे तपासणी व शारिरीक मोजमापे याकरीता **दिनांक २६.१२.२०१६ रोजी सकाळी १०.००** वाजता बोलाविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने उमेदवारांना खालीलप्रमाणे **सूचना** देण्यात येत आहेत.

१. दुस-या टप्प्यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या यादीमधील उमेदवारांची शारिरीक मोजमापे घेण्यात येऊन त्यामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच सदर दिवशी मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल. याकरीता उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दावा केलेनुसार खालीलप्रमाणे मूळ कागदपत्रे सोबत आणावीत तसेच **सदरचे सर्व कागदपत्रांची एक साक्षांकित (Attested) प्रत सोबत आणावी.**

(१) जातीचे प्रमाणपत्र, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र.

(२) एस.एस.सी./ एच.एस.सी. गुणपत्रके व प्रमाणपत्रे, एका पेक्षा जास्त संधीमध्ये उत्तीर्ण असल्यास तद्संबंधीची सर्व गुणपत्रके

(३) ऑनलाईन अर्जाची छायाप्रत.

(४) प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त/भूकंपग्रस्त/अंशकालीन/खेळाडू / होमगार्ड/रोजंदारी वनमजूर इ. संबंधी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र

(५) महिला उमेदवारांच्या बाबतीत जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे सक्षम प्राधिकारी यांचेकडील नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र

(६) डोमिसाईल प्रमाणपत्र (महाराष्ट्र राज्याबाहेर वास्तव्य असलेल्या उमेदवारांना फक्त खुल्या प्रवर्गासाठीच विचार करण्यात येईल व खुल्या प्रवर्गासाठी लागू असलेले निकष राहतील)

(७) खेळाडू उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय दिनांक १.७.२०१६ मधील तरतूदीनुसार संबंधीत विभागीय उपसंचालक यांनी निर्गमीत केलेले मूळ वैधता प्रमाणपत्र सोबत आणावे. यासंबंधीच्या सविस्तर सूचना www.kolhapurforest.co.in या संकेतस्थळावर यापूर्वीच प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

-२-

(८) माजी सैनिकांच्या बाबतीत Discharge Certificate तसेच Army Graduation चे प्रमाणपत्र सोबत आणावे.
(९) अंशकालीन उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयामध्ये नोंद असलेले प्रमाणपत्र सोबत आणावे. अन्यथा त्यांचा अंशकालीन या राखीव प्रवर्गासाठी विचार करण्यात येणार नाही.
(१०) रोजंदारी वनमजूर याकरीता ऑनलाईन अर्जामध्ये दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांना सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र सोबत आणावे. असे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांचा रोजंदारी वनमजूर या राखीव प्रवर्गासाठी विचार करण्यात येणार नाही.
(११) होमगार्ड उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमीत केलेले मूळ प्रमाणपत्र सोबत आणावे.
(१२) शासन सेवेत असलेल्या उमेदवारांनी त्यांचे कार्यालय/विभाग प्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे.
(१३) स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य असल्यास, तसे प्रमाणपत्र सादर करावे.

दुस-या टप्प्यामधील तात्पुरत्या यादीमधील उमेदवारांची सर्वप्रथम नियुक्त समितीमार्फत शारिरीक मोजमापे घेण्यात येतील. यामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल. जे उमेदवार शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांचे तपासणीमध्ये पात्र ठरतील, त्या उमेदवारांचा समावेश अंतिम लघुयादीमध्ये करण्यात येईल.

दिनांक २६.१२.२०१६ रोजी दुस-या टप्प्यामधील तात्पुरत्या लघुयादीमधील उमेदवारांची शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर यामध्ये अपात्र ठरलेले उमेदवारांचे संख्येइतके त्याच प्रवर्गामधील सर्वसाधारण गुणवत्तेनुसार (धावण्याचे टायमिंग) उमेदवारांची पूरक यादी प्रसिध्द करण्यात येईल व त्यांना भरती प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी देण्यात येईल. अशा पूरक लघुयादी मधील उमेदवारांची पुन्हा शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल व पुढील कार्यवाही पूर्ण केली जाईल.

**शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रे तपासणीचे ठिकाण**

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय,
वनवर्धन बिल्डींग, हेड पोस्ट ऑफिससमोर,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३.

सही/-
(अे.एम.अंजनकर)
सदस्य सचिव, प्रादेशिक निवड समिती
तथा उपवनसंरक्षक सातारा वनविभाग